महाराष्ट्र शासन

पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान जिल्हा कार्यदल बैठक
माहे - मे २०२४ च्या बैठकीत प्रकाशित

# शिक्षक / अधिकारी यांच्या उत्कृष्ट कामाची
# पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान यशोगाथा

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे.

**सन २०२३-२४**

# प्रकाशक

डॉ. मंजुषा क्षीरसागर, प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे.

# संकलन, टाईपसेटिंग व निर्मिती

डॉ. शिवाजी सिताराम ठाकूर, अधिव्याख्याता तथा गणित विभाग प्रमुख
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे.

# आमचे मार्गदर्शक

**मा. अभिनव गोयल I.A.S.,**

**अध्यक्ष, पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान जिल्हास्तरीय सुकाणू समिती तथा जिल्हाधिकारी धुळे.**

**मा. विशाल नरवाडे I.A.S.,**

**मिशन डायरेक्टर, पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान जिल्हा प्रकल्प सनियंत्रण कक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद धुळे.**

# अनमोल सहकार्य

**श्रीमती सुरेखा देवरे, गटशिक्षणाधिकारी,पंचायत समिती, ता. धुळे. तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हापरिषद, धुळे.**

**श्री. गणेश सुरवाडकर, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, ता. शिरपूर.**

**डॉ. सी. के. पाटील, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, ता. शिंदखेडा.**

**श्री. महेंद्र सोनवणे, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, ता. साक्री.**

## आमचे सहकारी

श्रीमती. जयश्री पाटील, वरिष्ठ अधिव्याख्याता

डॉ. जयप्रकाश पाटील, वरिष्ठ अधिव्याख्याता

श्री. रमेश चौधरी, वरिष्ठ अधिव्याख्याता

श्रीमती. सुचेता पाटील, अधिव्याख्याता

श्री. चंद्रकांत पवार, अधिव्याख्याता

श्री. भालचंद्र पाटील, अधिव्याख्याता

श्री. मिलिंद पंडित, अधिव्याख्याता

आणि

विषय साधनव्यक्ती, समावेशित तज्ज्ञ व विशेष शिक्षक

# प्रस्तावना

प्रत्येक बालकाला त्याच्या क्षमतेनुसार शिकता येणे आणि त्याच्या क्षमतेनुसार त्याला अध्ययन अनुभव प्राप्त होणे क्रमप्राप्त असते. त्या दृष्टिकोनातून प्रत्येक शाळेचे शिक्षक वेगवेगळे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीसाठी नियमित प्रयत्न करीत असतात. हे उपक्रम यशस्वी झाल्यामुळे त्या वर्गाची, विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढ होत असते. सन २०२६-२०२७ पर्यंत सर्व विद्यार्थ्यांना पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान प्राप्त व्हावे यासाठी जिल्हास्तरीय सुकाणू समिती, जिल्हा प्रकल्प सनियंत्रण कक्ष व जिल्हा कार्य दल तसेच शिक्षण विभागातील यंत्रणेतील सर्व परिवेक्षकीय यंत्रणा विद्यार्थी गुणवत्तेसाठी काम करत असतात हे काम करत असताना यशस्वी झालेले उपक्रम सर्व यंत्रणेसाठी प्रेरणादायी व्हावेत म्हणून गुगल लिंक द्वारे यशस्वी उपक्रमांची यशोगाथा शिक्षकांनी आमच्यापर्यंत पोहोचवली व आम्ही ते सर्व यंत्रणेला उपलब्ध करून देत आहोत.

सन २०२३ -२०२४ या शैक्षणिक वर्षात भाषा, गणित या दोन्ही विषयांसाठी यशस्वीपणे राबवलेल्या उपक्रमांचे संकलन या पुस्तिकेद्वारे आपल्यापर्यंत देत आहोत. निश्चितच ही पुस्तिका आपल्या सर्वांसाठी उपयोगी व प्रेरणादायी ठरेल. यशस्वी उपक्रम राबविलेल्या सर्व शिक्षकांचे व त्यांच्या पर्यवेक्षकीय यंत्रणेचे अभिनंदन.

**डॉ. शिवाजी ठाकूर**
**अधिव्याख्याता**

**डॉ. मंजुषा क्षीरसागर**
**प्राचार्य**

# अनुक्रमणिका


| अ क्र | अधिकारी / शिक्षकाचे नाव | पदनाम | तालुका | विषय | उपक्रम / कृती चे नाव | पान क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. जयश्री वसंतराव बोरसे | प्राथमिक शिक्षिका | शिंदखेडा | भाषा | नवीन शब्द शिकणे व समजून घेणे. | ७ ते ९ |
| २ | श्रीम. जयश्री वसंतराव बोरसे | प्राथमिक शिक्षिका | शिंदखेडा | गणित | दैनंदिन ओळख करणे | १० ते १२ |
| ३ | श्रीमती शितल आधार चव्हाण | प्राथमिक शिक्षिका | शिंदखेडा | भाषा | सुंदर माझे हस्ताक्षर | १३ ते १६ |
| ४ | कैलास गोविंदा वाघ | प्राथमिक शिक्षक | शिंदखेडा | भाषा | काव्यांजली ....एक काव्य प्रवास | १७ ते १९ |
| ५ | श्री. श्रीकांत नवल खैरनार | प्राथमिक शिक्षक | शिंदखेडा | गणित | गुणाकार | २० ते २१ |
| ६ | श्रीमती रत्नमाला चिंतामण देवरे | प्राथमिक शिक्षिका | साक्री | गणित | चला गणिताच्या जत्रेत फेरफटका मारुया | २२ ते २४ |


- **विशेष सूचना - या पुस्तिकेत यशोगाथा मध्ये दिलेला उपक्रमांची माहिती शिक्षकांनी स्वत: लिंक मध्ये भरली आहे. उपक्रमाची यशस्वीता स्वत: शिक्षकांनी मांडलेली आहे. गणित विभाग, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था धुळे यांनी गुगल लिंक द्वारे यशोगाथांचे संकलन केले आहे.**

| यशोगाथा प्राप्त क्र. - १ | |
|---|---|
| शिक्षक / अधिकारी यांच्या उत्कृष्ठ कामाची पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान यशोगाथा सन २०२३-२४ | |
| **संकलन - जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे.** | |
| अधिकारी / शिक्षकाचे नाव (मराठीमध्ये ) | **श्रीम. जयश्री वसंतराव बोरसे** |
| कार्यालय / शाळा (मराठीमध्ये ) | **जि. प. शाळा विटाई** |
| पदनाम | **शिक्षक** |
| केंद्र (फक्त शिक्षक व केंद्रप्रमुख यांचेसाठी ) | **कलमाडी** |
| बिट (फक्त शिक्षक, केंद्रप्रमुख व शिक्षण विस्तार अधिकारी यांचेसाठी ) | **चिरणे** |
| तालुका | **शिंदखेडा** |
| उपक्रमाचे कार्यक्षेत्र | **फक्त माझी शाळा** |
| उपक्रम / कृती कोणत्या विषयाचा आहे ? | **भाषा** |
| उपक्रम / कृती चे नाव (मराठीमध्ये ) | **नवीन शब्द शिकणे व समजून घेणे.** |
| उपक्रम / कृती कोणत्या अध्ययन निष्पत्ती साठी राबविला ? (मराठीमध्ये ) | **विविध साहित्यप्रकारांत आलेल्या नवीन शब्दांचा अर्थ समजून घेऊन त्यांचा अर्थ सुनिश्चित करतात.** |
| तुमच्या वर्गाची पटसंख्या (अधिकारी यांनी उपक्रम राबविलेल्या कार्यक्षेत्राची पटसंख्या द्यावी.) | **15** |

| | |
|---|---|
| उपक्रम राबविण्यापूर्वी सरासरी उपस्थिती (अधिकारी यांनी उपक्रम राबविलेल्या कार्यक्षेत्राची पटसंख्या द्यावी.) | 14 |
| उपक्रम राबविल्या नंतर सरासरी उपस्थिती (अधिकारी यांनी उपक्रम राबविलेल्या कार्यक्षेत्राची पटसंख्या द्यावी.) | 14 |
| उपक्रम / कृती राबविण्यापूर्वी किती विद्यार्थ्यांना उपरोक्त अध्ययन निष्पत्ती अप्राप्त होती ? | 4 |
| या कारणांमुळे उपक्रम राबविला / कृती केली. (मराठीमध्ये ) | 1.विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी निर्माण व्हावी<br>2.नवीन शब्द शिकण्याची आवड, उत्सुकता निर्माण व्हावी.<br>3.स्वत:विषयी लिहीता यावे.<br>4.अभ्यासाची गोडी निर्माण व्हावी. |
| उपक्रम / कृती साठी केलेली प्रत्यक्ष कार्यवाही (मराठीमध्ये ) | माझी जून महिन्यात नुकतीच बदली झाली आणि मी विद्यार्थ्यांशी अनभिज्ञ होते म्हणून फक्त15 दिवस मुलांशी ओळख एक मैत्रीचं वातावरण निर्माण केले. आणि मग हळूहळू त्याच्यात रमत गेले व त्यांना आपलंसं केले..<br>आणि एक विद्यार्थ्यांसाठी नवीन उपक्रम घ्यावा असा मनात विचार आला... मी सातारा जिल्ह्यातील सावित्री जगदाळे यांचे पुस्तक वाचले व विद्यार्थ्यांना ते मिळावे म्हणून प्रयत्न केला.. व साताऱ्याहून लेखिकेने पोस्टाने 5 बालसाहित्य विटाई शाळेतील विद्यार्थ्यांना दिलीत... मग आमच्या बालगोपालांनी ती पुस्तके वाचून लेखिकेस पत्रे |

| | |
|---|---|
| | पाठवलीत ..लेखिका सावित्री जगदाळे ताईनी विद्यार्थ्यांचे खूप आभार मानले |
| उपक्रम / कृती राबविल्यानंतर किती विद्यार्थ्यांना उपरोक्त अध्ययन निष्पत्ती प्राप्त झाली ? | 10 |
| उपक्रम / कृती साठी वापरलेले शैक्षणिक साहित्य (मराठीमध्ये ) | बालसाहित्य<br>उदाःआजोपिज्जा, स्पायडरमॅन आणि शौर्य, उजळपरी,दुधाच्या मिश्या, सफर मंगळावरची , चिंचबन इ. |
| संदर्भ / पूरक साहित्य (असल्यास ) (मराठीमध्ये ) | वर्तमानपत्र, पाठ्यपुस्तक इ. |
| ह्या उपक्रम / कृती मुळे विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या बाबी / घटक (मराठीमध्ये ) | 1.विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी वाढली. 2.विद्यार्थ्यांचा वाचनातील स्पष्टपणा दिसू लागला. 3.वाचनाची आवड निर्माण झाली. |
| या उपक्रम / कृती संदर्भात काही विशेष असल्यास (मराठीमध्ये ) | 1.विद्यार्थ्यांना पत्रलेखनाचा व्यवहार कळू लागला. 2.प्रत्येक मूल हे पोस्टाने आलेले लेखिका जगदाळे ताईचे पुस्तक वाचण्यास पुढे येवू लागले... |

| यशोगाथा प्राप्त क्र. - 2 | |
|---|---|
| शिक्षक / अधिकारी यांच्या उत्कृष्ठ कामाची पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान यशोगाथा सन २०२३-२४ | |
| संकलन - जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे. | |
| अधिकारी / शिक्षकाचे नाव (मराठीमध्ये ) | श्रीम. जयश्री वसंतराव बोरसे |
| कार्यालय / शाळा (मराठीमध्ये ) | जि. प. शाळा विटाई |
| पदनाम | शिक्षक |
| केंद्र (फक्त शिक्षक व केंद्रप्रमुख यांचेसाठी ) | कलमाडी |
| बिट (फक्त शिक्षक, केंद्रप्रमुख व शिक्षण विस्तार अधिकारी यांचेसाठी ) | चिरणे |
| तालुका | शिंदखेडा |
| उपक्रमाचे कार्यक्षेत्र | फक्त माझी शाळा |
| उपक्रम / कृती कोणत्या विषयाचा आहे ? | गणित |
| उपक्रम / कृती चे नाव (मराठीमध्ये ) | दैनंदिन ओळख करणे |
| उपक्रम / कृती कोणत्या अध्ययन निष्पत्ती साठी राबविला ? (मराठीमध्ये ) | दिनदर्शिकेतील विशिष्ट दिवस आणि तारीख ओळखतात. |
| तुमच्या वर्गाची पटसंख्या (अधिकारी यांनी उपक्रम राबविलेल्या कार्यक्षेत्राची पटसंख्या द्यावी.) | 15 |

| | |
|---|---|
| उपक्रम राबविण्यापूर्वी सरासरी उपस्थिती (अधिकारी यांनी उपक्रम राबविलेल्या कार्यक्षेत्राची पटसंख्या द्यावी.) | 14 |
| उपक्रम राबविल्या नंतर सरासरी उपस्थिती (अधिकारी यांनी उपक्रम राबविलेल्या कार्यक्षेत्राची पटसंख्या द्यावी.) | 14 |
| उपक्रम / कृती राबविण्यापूर्वी किती विद्यार्थ्यांना उपरोक्त अध्ययन निष्पत्ती अप्राप्त होती ? | 6 |
| या कारणांमुळे उपक्रम राबविला / कृती केली. (मराठीमध्ये ) | 1.विद्यार्थ्यांना वार, दिनांक सांगता यावा.<br>2.स्वतःचा जन्मदिवस माहित असावा व तो तो सांगता यावा<br>3. थोर नेत्यांच्या जयंती व पुण्यतिथी माहित असावी.<br>4.सण व उत्सव कळावेत. |
| उपक्रम / कृती साठी केलेली प्रत्यक्ष कार्यवाही (मराठीमध्ये ) | विद्यार्थ्यांना सुरूवातीला झेंडावंदन कधी होते... त्यांची तारीख विचारली.. विद्यार्थी बरोबर उत्तर देवू लागलेत.. मग स्वतःची जन्मतारीख विचारली असता ते माहीत नाही म्हणून मला त्यांचा वाढदिवस परिपाठाला साजरा करून तो विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून दिला.. व दिनदर्शिकेनुसार त्यांचे महत्त्व पटवून दिले. |
| उपक्रम / कृती राबविल्यानंतर किती विद्यार्थ्यांना उपरोक्त अध्ययन निष्पत्ती प्राप्त झाली ? | 14 |
| उपक्रम / कृती साठी वापरलेले शैक्षणिक साहित्य (मराठीमध्ये ) | अंक कार्ड , दिनदर्शिका इ. |
| संदर्भ / पूरक साहित्य (असल्यास ) (मराठीमध्ये ) | अंक कार्ड व दिनदर्शिका इ. |

| | |
|---|---|
| ह्या उपक्रम / कृती मुळे विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या बाबी / घटक (मराठीमध्ये ) | 1.विद्यार्थी स्वतःच्या वाढदिवसाची तारीख शोधतात . 2.विद्यार्थी स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक दिनाची भाषणे बरोबर तयारीने करू लागलीत.. |
| या उपक्रम / कृती संदर्भात काही विशेष असल्यास (मराठीमध्ये ) | 1.विद्यार्थ्यांना जन्म तारीख लक्षात ठेवता आली. 2.विद्यार्थी स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक दिन लक्षात ठेवू लागलेत. |

| यशोगाथा प्राप्त क्र. - 3 | |
|---|---|
| शिक्षक / अधिकारी यांच्या उत्कृष्ठ कामाची पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान यशोगाथा सन २०२३-२४ | |
| संकलन - जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे. | |
| अधिकारी / शिक्षकाचे नाव (मराठीमध्ये ) | श्रीमती शितल आधार चव्हाण |
| कार्यालय / शाळा (मराठीमध्ये ) | जिल्हा परिषद शाळा सवाई मुकटी तालुका शिंदखेडा जिल्हा धुळे |
| पदनाम | शिक्षक |
| केंद्र (फक्त शिक्षक व केंद्रप्रमुख यांचेसाठी ) | तामथरे |
| बिट (फक्त शिक्षक, केंद्रप्रमुख व शिक्षण विस्तार अधिकारी यांचेसाठी ) | चिमठाणे |
| तालुका | शिंदखेडा |
| उपक्रमाचे कार्यक्षेत्र | फक्त माझी शाळा |
| उपक्रम / कृती कोणत्या विषयाचा आहे ? | भाषा |
| उपक्रम / कृती चे नाव (मराठीमध्ये ) | सुंदर माझे हस्ताक्षर |
| उपक्रम / कृती कोणत्या अध्ययन निष्पत्ती साठी राबविला ? (मराठीमध्ये ) | शुद्धलेखन, लेखनात विरामचिन्हांचा समज पूर्वक वापर करणे,आवडते विषय निवडून त्यावर लिहिणे. |

| | |
|---|---|
| तुमच्या वर्गाची पटसंख्या (अधिकारी यांनी उपक्रम राबविलेल्या कार्यक्षेत्राची पटसंख्या द्यावी.) | **91** |
| उपक्रम राबविण्यापूर्वी सरासरी उपस्थिती (अधिकारी यांनी उपक्रम राबविलेल्या कार्यक्षेत्राची पटसंख्या द्यावी.) | **91** |
| उपक्रम राबविल्या नंतर सरासरी उपस्थिती (अधिकारी यांनी उपक्रम राबविलेल्या कार्यक्षेत्राची पटसंख्या द्यावी.) | **91** |
| उपक्रम / कृती राबविण्यापूर्वी किती विद्यार्थ्यांना उपरोक्त अध्ययन निष्पत्ती अप्राप्त होती ? | **लेखनासंदर्भात 90% विद्यार्थ्यांची अध्ययन निष्पत्ती अप्राप्त होती** |
| या कारणांमुळे उपक्रम राबविला / कृती केली. (मराठीमध्ये ) | सुंदर अक्षर हाच खरा दागिना आहे.हा सुविचार आपणास माहीतच आहे. सुंदर हस्ताक्षरला आपल्या दैनंदिन जीवनात अनन्य साधारण महत्त्व आहे.अक्षरावरून बऱ्यापैकी माणसाचा स्वभाव ओळखला जातो.स्वच्छ व वळणदार अक्षराला सुंदर अक्षर असे म्हणतात. शाळा कॉलेज पासून ते नोकरीच्या ठिकाणी सुद्धा सुंदर अक्षर खूप उपयोगी पडते. शाळा कॉलेजातील परीक्षेत लिहिलेले पेपर तपासणारे पेपर तपासणीस सुद्धा तुमचे अक्षर सुंदर असेल तर तुमच्या अक्षराच्या जोरावर चांगल्यापैकी गुण देतात.<br>पेपर मध्ये उत्तर कमी लिहिले असेल किंवा शंभर टक्के बरोबर नसेल तरी तुम्ही तुमच्या सुंदर अक्षरामुळे पेपर तपासणीसाला काही प्रमाणात गुण देण्यास भाग पाडू शकता,एवढी ताकद सुंदर अक्षरांमध्ये आहे सुंदर अक्षर पाहून काही जण त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वावर आकर्षित होत असतात.असे म्हटले तरी अतिशयोक्ती ठरू नये आज -काल लिहिण्यासाठी संगणकाचा वापर होत असला तरी सुंदर व सुबक हस्ताक्षर लेखनाचे महत्त्व कधीही कमी होणार नाही आणि आधुनिक युगात सुंदर हस्ताक्षरला अजून पर्यंत पर्याय उपलब्ध झालेला नाही.<br>वरील सुंदर हस्ताक्षराचे महत्त्व पटवून ते स्पष्ट करण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम राबविण्यास ठरविले. |

| | |
|---|---|
| उपक्रम / कृती साठी केलेली प्रत्यक्ष कार्यवाही (मराठीमध्ये ) | दिनांक 19 मे 2023 रोजी जिल्हा परिषद शाळा सवाई मुकटी येथे नव्याने नियुक्ती मिळाली. 15 जून 2023 पासून शाळेत प्रत्यक्ष शैक्षणिक कामाला प्रारंभ झाला. तेव्हापासून दैनंदिन अध्ययन अध्यापनात बऱ्याच विद्यार्थ्यांचे अशुद्ध लेखन पाहून मनात विचार आला की आपण या विद्यार्थ्यांचे लेखन दोष शालेय वयातच सुधारले तर मुलांना त्यांच्या भावी आयुष्यात सुंदर हस्ताक्षराचा उपयोग निश्चितच चांगला होईल आणि मग मुलांच्या चांगल्या अक्षरासाठी सुंदर माझी हस्ताक्षर हा उपक्रम राबविण्यासंदर्भात मनात निश्चय केला.<br>सदर उपक्रम राबविताना सर्वप्रथम विद्यार्थ्यांना दुरेघी वहीत लेखन कसे करावे, पेन पेन्सिल हातात कसा व किती अंतरावरून धरावा,लिहिताना बसण्याची पद्धत पेपर किंवा वही ठेवण्याची जागा याविषयी सविस्तर सूचना दिल्या. उपक्रम लेखनाची सुरुवात फळ्यावर अक्षरांच्या अवयवांपासून करण्यात आली.त्यापुढे मुळाक्षरे, शब्द, छोटे वाक्य, जोडाक्षरे वाक्य, छोटे उतारे, गोष्ट लेखन अशाप्रकारे विद्यार्थ्यांना दुरेघी वहीमध्ये दररोजचे लेखन देण्यात आले. विद्यार्थी देखील दिलेल्या सूचनांचे पालन करून दुरेघी वहीमध्ये वळणदार अक्षरात लिहिण्याचा चांगला प्रयत्न करू लागले. सुरुवातीला बऱ्याच विद्यार्थ्यांनी लेखनात चुका केल्या शिक्षकांनी हस्ताक्षर तपासणी करताना विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक चुका या समजावून सांगितल्या चांगले व वळणदार सुंदर हस्ताक्षर काढणाऱ्या मुलांना शाबासकी देऊन प्रलोभन दिले गेले त्यामुळे मूलं पुढच्या वेळेस लेखनातील चुका न करता अधिक चांगले हस्ताक्षर काढण्याचा प्रयत्न आपोआपच करू लागली.मुलांमध्ये जणू सुंदर माझे हस्ताक्षराची स्पर्धाच निर्माण झाली. |
| उपक्रम / कृती राबविल्यानंतर किती विद्यार्थ्यांना उपरोक्त अध्ययन निष्पत्ती प्राप्त झाली ? | **साधारणता 85 % विद्यार्थ्यांना सुंदर हस्ताक्षर संदर्भात अध्ययन निष्पत्ती प्राप्त झाली. 100% अध्ययन निष्पत्ती प्राप्तीसाठी आजही शाळेत नियमित स्वरूपात सदर उपक्रम राबविला जातो.** |

| | |
|---|---|
| उपक्रम / कृती साठी वापरलेले शैक्षणिक साहित्य (मराठीमध्ये ) | फळा, दुरेघी वही,पेन्सिल,खोडरबर इत्यादी. |
| संदर्भ / पूरक साहित्य (असल्यास ) (मराठीमध्ये ) | शब्द कार्ड, वाक्य छोटे,प्रसंग उतारे,छोट्या गोष्टी कथा इत्यादी. |
| ह्या उपक्रम / कृती मुळे विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या बाबी / घटक (मराठीमध्ये ) | विद्यार्थ्यांच्या लेखनातील चुका कमी होऊन लेखन सुधारण्यास मदत झाली. दोन अक्षरे शब्द यातील समांतर अंतर ठेवणे,अचूक लेखन करणे,दैनंदिन लेखन केल्यानंतर ते हस्ताक्षर कसे आले याची समीक्षा करणे/तपासणे, ठळक वळणदार व सुंदर अक्षर काढणे, इत्यादी बाबी विद्यार्थ्यांनी प्राप्त केल्या. |
| या उपक्रम / कृती संदर्भात काही विशेष असल्यास (मराठीमध्ये ) | विद्यार्थ्यांचा लेखनासंदर्भात स्वतःवरील आत्मविश्वास वाढला. व लेखन करता करता विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्य देखील वाढले. |

| | |
|---|---|
| यशोगाथा प्राप्त क्र. - 4 | |
| शिक्षक / अधिकारी यांच्या उत्कृष्ठ कामाची पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान यशोगाथा सन २०२३-२४ | |
| **संकलन - जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे.** | |
| **अधिकारी / शिक्षकाचे नाव (मराठीमध्ये )** | **कैलास गोविंदा वाघ** |
| **कार्यालय / शाळा (मराठीमध्ये )** | **जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खलाणे** |
| **पदनाम** | **शिक्षक** |
| **केंद्र (फक्त शिक्षक व केंद्रप्रमुख यांचेसाठी )** | **कलमाडी** |
| **बिट (फक्त शिक्षक, केंद्रप्रमुख व शिक्षण विस्तार अधिकारी यांचेसाठी )** | **चिरणे** |
| **तालुका** | **शिंदखेडा** |
| **उपक्रमाचे कार्यक्षेत्र** | **फक्त माझी शाळा** |
| **उपक्रम / कृती कोणत्या विषयाचा आहे ?** | **भाषा** |
| **उपक्रम / कृती चे नाव (मराठीमध्ये )** | **काव्यांजली ....एक काव्य प्रवास** |
| **उपक्रम / कृती कोणत्या अध्ययन निष्पत्ती साठी राबविला ? (मराठीमध्ये )** | **आपल्या कल्पनेनुसार गोष्ट ,कविता ,वर्णन,इत्यादी लिहितांना भाषेचा सर्जनशीलतेने वापर करतात.** |
| **तुमच्या वर्गाची पटसंख्या (अधिकारी यांनी उपक्रम राबविलेल्या कार्यक्षेत्राची पटसंख्या द्यावी.)** | **59** |

| | |
|---|---|
| उपक्रम राबविण्यापूर्वी सरासरी उपस्थिती (अधिकारी यांनी उपक्रम राबविलेल्या कार्यक्षेत्राची पटसंख्या द्यावी.) | 40 |
| उपक्रम राबविल्या नंतर सरासरी उपस्थिती (अधिकारी यांनी उपक्रम राबविलेल्या कार्यक्षेत्राची पटसंख्या द्यावी.) | 45 |
| उपक्रम / कृती राबविण्यापूर्वी किती विद्यार्थ्यांना उपरोक्त अध्ययन निष्पत्ती अप्राप्त होती ? | 20 |
| या कारणांमुळे उपक्रम राबविला / कृती केली. (मराठीमध्ये ) | विद्यार्थ्यांना भाषिक सौंदर्य समजावे. भाषा वापरताना काव्य प्रकार समजावा. आपल्या स्व कल्पनांना वाव मिळावा. स्वतः काव्य रचना करून भाषिक ज्ञान वाढवता येते. हे कृतीतून समजेल. काव्य लिहितांना शब्द संग्रह आवश्यक असल्याने त्यासाठी वाचनाची आपोआप आवड निर्माण होईल. स्व रचनेचा आनंद वेगळाच असतो हो अनुभव देण्यासाठी हा उपक्रम राबवला. |
| उपक्रम / कृती साठी केलेली प्रत्यक्ष कार्यवाही (मराठीमध्ये ) | व्हरांड्यात दर्शनी भागाला फळा लावलेला आहे. शालेय परिपाठ संपल्यावर विद्यार्थ्यांना त्या फळ्यावर काव्यांजली हा काव्य प्रकार लिहिलेला असतो. दररोज नित्यनियमाने विद्यार्थ्यांना काव्य लिहिण्यासाठी आवड निर्माण होईल म्हणून दररोज नव काव्य लिहिले जाते. सर्व विद्यार्थी ते आपल्या नोंदवहीत लिहितात. दिवसभरात त्याचे वाचन होते. |
| उपक्रम / कृती राबविल्यानंतर किती विद्यार्थ्यांना उपरोक्त अध्ययन निष्पत्ती प्राप्त झाली ? | उपक्रम राबविल्या नंतर 40 विद्यार्थ्यांना अध्ययन निष्पत्ती प्राप्त झाली. |

| | |
|---|---|
| उपक्रम / कृती साठी वापरलेले शैक्षणिक साहित्य (मराठीमध्ये ) | उपक्रमासाठी शालेय फलक,काव्य संग्रह,या शैक्षणिक साहित्याची गरज भासली. |
| संदर्भ / पूरक साहित्य (असल्यास ) (मराठीमध्ये ) | भाषा काव्य प्रकारासाठी काव्य लेखन करणारे कवी ग.दि.माडगूळकर, शांता शेळके, इंद्रजीत भालेराव, राजीव तांबे, केशवसुत, अश्या कवींच्या काव्य संग्राचा पूरक साहित्य म्हणून वापर करण्यात आला. |
| ह्या उपक्रम / कृती मुळे विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या बाबी / घटक (मराठीमध्ये ) | या उपक्रमामुळे सर्जनशीलता निर्माण झाली.स्वतः काव्य वाचनाचा आनंद मिळत असल्याने आत्मविश्वास वाढला.काव्य पंक्तीतील यमक काय असते हे माहित करून कवितेचा आनंद घेत आहेत. |
| या उपक्रम / कृती संदर्भात काही विशेष असल्यास (मराठीमध्ये ) | ही कृती सतत सर्जनशीलतेला वाव देते.भाषिक सौंदर्य या बालवयात समजले तर मोठे झाल्यावर त्याला कविता लेखनाचा छंद निर्माण होईल.स्वतःचा काव्य ओळींचा संग्रह तयार होईल. इतरांना ही तो प्रेरित करेल. |

| यशोगाथा प्राप्त क्र. - 5 | |
|---|---|
| शिक्षक / अधिकारी यांच्या उत्कृष्ठ कामाची पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान यशोगाथा सन २०२३-२४ | |
| **संकलन - जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे.** | |
| **अधिकारी / शिक्षकाचे नाव (मराठीमध्ये )** | **श्री. श्रीकांत नवल खैरनार** |
| **कार्यालय / शाळा (मराठीमध्ये )** | **जिल्हा परिषद प्राथमिक शाळा होळ नं. १** |
| **पदनाम** | **शिक्षक** |
| **केंद्र (फक्त शिक्षक व केंद्रप्रमुख यांचेसाठी )** | **नरडाणा** |
| **बिट (फक्त शिक्षक, केंद्रप्रमुख व शिक्षण विस्तार अधिकारी यांचेसाठी )** | **नरडाणा** |
| **तालुका** | **शिंदखेडा** |
| **उपक्रमाचे कार्यक्षेत्र** | **फक्त माझी शाळा** |
| **उपक्रम / कृती कोणत्या विषयाचा आहे ?** | **गणित** |
| **उपक्रम / कृती चे नाव (मराठीमध्ये )** | **गुणाकार** |
| **उपक्रम / कृती कोणत्या अध्ययन निष्पत्ती साठी राबविला ? (मराठीमध्ये )** | **गणन क्रिया समजणे व व्यवहारात उपयोग होणे** |
| **तुमच्या वर्गाची पटसंख्या (अधिकारी यांनी उपक्रम राबविलेल्या कार्यक्षेत्राची पटसंख्या द्यावी.)** | **24** |

| | |
|---|---|
| उपक्रम राबविण्यापूर्वी सरासरी उपस्थिती (अधिकारी यांनी उपक्रम राबविलेल्या कार्यक्षेत्राची पटसंख्या द्यावी.) | 17 |
| उपक्रम राबविल्या नंतर सरासरी उपस्थिती (अधिकारी यांनी उपक्रम राबविलेल्या कार्यक्षेत्राची पटसंख्या द्यावी.) | 23 |
| उपक्रम / कृती राबविण्यापूर्वी किती विद्यार्थ्यांना उपरोक्त अध्ययन निष्पत्ती अप्राप्त होती ? | 19 |
| या कारणांमुळे उपक्रम राबविला / कृती केली. (मराठीमध्ये ) | विद्यार्थ्यांना गणित विषयाची भीती कमी व्हावी. |
| उपक्रम / कृती साठी केलेली प्रत्यक्ष कार्यवाही (मराठीमध्ये ) | गणित पेटी साहित्य वापरून तसेच विद्यार्थी मधील व्यवहारिक विचारांचा उपयोग केला. |
| उपक्रम / कृती राबविल्यानंतर किती विद्यार्थ्यांना उपरोक्त अध्ययन निष्पत्ती प्राप्त झाली ? | 20 |
| उपक्रम / कृती साठी वापरलेले शैक्षणिक साहित्य (मराठीमध्ये ) | गणित पेटी साहित्य multiplication chart. |
| संदर्भ / पूरक साहित्य (असल्यास ) (मराठीमध्ये ) | इयत्ता चौथी पाठ्यपुस्तक. |
| ह्या उपक्रम / कृती मुळे विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या बाबी / घटक (मराठीमध्ये ) | गणितीय क्रिया करण्यासाठी विद्यार्थी मध्ये चढाओढ सुरू झाली. |
| या उपक्रम / कृती संदर्भात काही विशेष असल्यास (मराठीमध्ये ) | विद्यार्थ्यांना त्यांच्या पद्धतीने आवडेल अश्या पद्धतीने शिकण्यास प्रवृत्त केले. |

| | |
|---|---|
| यशोगाथा प्राप्त क्र. - 6 | |
| शिक्षक / अधिकारी यांच्या उत्कृष्ठ कामाची पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान यशोगाथा सन २०२३-२४ | |
| **संकलन - जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे.** | |
| **अधिकारी / शिक्षकाचे नाव (मराठीमध्ये )** | **श्रीमती रत्नमाला चिंतामण देवरे** |
| **कार्यालय / शाळा (मराठीमध्ये )** | **जि.प.शाळा छाईल ता.साक्री जि.धुळे** |
| **पदनाम** | **शिक्षक** |
| **केंद्र (फक्त शिक्षक व केंद्रप्रमुख यांचेसाठी )** | **नाडसे** |
| **बिट (फक्त शिक्षक, केंद्रप्रमुख व शिक्षण विस्तार अधिकारी यांचेसाठी )** | **कासारे** |
| **तालुका** | **साक्री** |
| **उपक्रमाचे कार्यक्षेत्र** | **फक्त माझी शाळा** |
| **उपक्रम / कृती कोणत्या विषयाचा आहे ?** | **गणित** |
| **उपक्रम / कृती चे नाव (मराठीमध्ये )** | **चला गणिताच्या जत्रेत फेरफटका मारुया** |
| **उपक्रम / कृती कोणत्या अध्ययन निष्पत्ती साठी राबविला ? (मराठीमध्ये )** | **इयत्ता चौथीच्या गणित विषयाच्या सर्व अध्ययन निष्पत्ती** |
| **तुमच्या वर्गाची पटसंख्या (अधिकारी यांनी उपक्रम राबविलेल्या कार्यक्षेत्राची पटसंख्या द्यावी.)** | **35** |

| | |
|---|---|
| उपक्रम राबविण्यापूर्वी सरासरी उपस्थिती (अधिकारी यांनी उपक्रम राबविलेल्या कार्यक्षेत्राची पटसंख्या द्यावी.) | 26 |
| उपक्रम राबविल्या नंतर सरासरी उपस्थिती (अधिकारी यांनी उपक्रम राबविलेल्या कार्यक्षेत्राची पटसंख्या द्यावी.) | 34 |
| उपक्रम / कृती राबविण्यापूर्वी किती विद्यार्थ्यांना उपरोक्त अध्ययन निष्पत्ती अप्राप्त होती ? | 13 |
| या कारणांमुळे उपक्रम राबविला / कृती केली. (मराठीमध्ये ) | 1)सदरचे विद्यार्थी कोविड काळात इयत्ता पहिलीत दाखल झाले होते. पण त्या काळात शाळा बंद असल्यामुळे त्यांच्या अध्ययन अध्यापनात अडचणी निर्माण होऊन योग्य संपादणूक पातळी गाठू शकले नाहीत. 2)गणित विषयातील अमूर्त संकल्पना विद्यार्थ्यांना समजत नव्हत्या. 3) गणित विषयाची मुलांना भीती वाटत होती त्यामुळे गणिताची गोडी निर्माण झाली नाही. 4)विद्यार्थ्यांमध्ये गणित विषयाबद्दल अनास्था निर्माण झाली होती. |
| उपक्रम / कृती साठी केलेली प्रत्यक्ष कार्यवाही (मराठीमध्ये ) | 1) अप्रगत विद्यार्थ्यांची मोठी संख्या बघून प्रथम त्यांची यादी तयार केली 2) कोणत्या अध्ययन निष्पत्ती प्राप्त होण्यास अडचणी येत आहेत त्यावर आधारीत स्वयं निर्मित शैक्षणिक साहीत्य तयार केले. 3) त्यानंतर प्रत्येक मंगळवारी शाळेच्या व्हरांड्यात टेबलांवर योग्य क्रमाने शैक्षणिक साहीत्याचे स्टॉल मांडून ठेवले. 4) प्रगत विद्यार्थ्यांना सदरच्या स्टॉलवर मार्गदर्शन करण्यासाठी नियुक्त केले. 5) स्टॉलची आकर्षक मांडणी केल्यामुळे विद्यार्थी कुतूहलापोटी स्टॉलला भेट देऊन आपल्या सहाध्यायी मित्रांकडून शिकू लागली. 6)विद्यार्थ्यांची आपापसात शैक्षणिक चर्चा घडू लागली तसेच ज्या ठिकाणी अडचणी आल्या तेथे मी स्वतः सुलभकाची भुमिका पार पाडली. 7) विद्यार्थ्यांचे स्वयं अध्ययन घडून गणिताची गोडी निर्माण झाली. 8)योग्य नियोजन आणि व्यवास्थापन यामुळे गणित विषयाच्या सर्व अध्ययन निष्पत्ती जवळपास 90 टक्के विद्यार्थ्यांना प्राप्त झाल्या. |

| | |
|---|---|
| उपक्रम / कृती राबविल्यानंतर किती विद्यार्थ्यांना उपरोक्त अध्ययन निष्पत्ती प्राप्त झाली ? | 33 |
| उपक्रम / कृती साठी वापरलेले शैक्षणिक साहित्य (मराठीमध्ये ) | गणित पेटी,,भास्कराचार्य गणित पेटी आणि स्वयं निर्मित शैक्षणिक साहीत्य सर्व अध्ययन निष्पत्तीवर आधारीत. |
| संदर्भ / पूरक साहित्य (असल्यास ) (मराठीमध्ये ) | करूया मैत्री गणिताशी इयत्ता चौथीची कार्यपुस्तिका |
| ह्या उपक्रम / कृती मुळे विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या बाबी / घटक (मराठीमध्ये ) | 1) गणित विषयाची भीती दूर होऊन आवड निर्माण झाली.2)गणितातील अमुर्त संकल्पना मूर्त स्वरुपात स्पष्ट झाल्या.3)इयत्ता चौथीच्या गणित विषयाच्या सर्व अध्ययन निष्पत्ती प्राप्त झाल्या..4) विद्यार्थी स्वयंप्रेरणेने अध्ययन करू लागली.5) गुणवत्तेत सकारात्मक स्पर्धा निर्माण होऊन संपादणूक पातळीत वाढ झाली.. |
| या उपक्रम / कृती संदर्भात काही विशेष असल्यास (मराठीमध्ये ) | विद्यार्थ्यांच्या उपस्थित लक्षणीय वाढ झाली.शैक्षणिक गुणवत्ता संपादणूक पातळीत वाढ झाली. |